युवाराष्ट्र दर्शन

# चंद्रपूर जिल्हा

२

बुधवार दि.७ जानेवारी २०२६

## शाळा व महाविद्यालयांत मतदान जनजागृती अभियान

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.६ :** चंद्रपूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये मतदानाबाबत जनजागृती निर्माण करणे, मतदानाचे महत्त्व पटवून देणे तसेच मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या उद्देशाने चंद्रपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये स्वीप तदान जनजागृती अभियान राबविण्यात येत असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील यांनी दिली.बुधवार ३१ डिसेंबर रोजी मनपा राणी हिराई सभागृहात विविध शाळांच्या मुख्याध्यापकांची बैठक बोलविण्यात आली होती. सदर बैठकीस उपायुक्त संदीप चिद्रावार, उपशिक्षणाधिकारी माध्यमिक विशाल देशमुख,उपशिक्षणाधिकारी प्राथमिक गणेश येरमे,मनपा प्रशासन अधिकारी सुनील आत्राम, नागेश नित तसेच ७३ शाळांचे प्रतिनिधी उपस्थित होते. राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनानुसार सदर अभियानांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अभियानाच्या पहिल्या दिवशी दि. ५ जानेवारी २०२६ रोजी सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये 'चंद्रपूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक व माझे कर्तव्य' या विषयावर निबंध स्पर्धा, ६ जानेवारी २०२६ रोजी 'मनपा चंद्रपूर सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६' या विषयावर चित्रकला स्पर्धा, तर दि. ७ जानेवारी २०२६ रोजी शाळा व महाविद्यालयांमध्ये चर्चासत्र, पोस्टर स्पर्धा व रांगोळी स्पर्धा शाळास्तरावर आयोजित करण्यात येणार आहेत.८ जानेवारी २०२६ रोजी सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, दि. ९ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता गांधी चौक, चंद्रपूर येथे मनपा स्तरावरील चित्रकला स्पर्धा होणार आहे. शाळा स्तरावरील चित्रकला स्पर्धेतील तीन विजयी स्पर्धक या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.दि. १० जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८.०० ते ९.०० या वेळेत सर्व शाळा, महाविद्यालयांमार्फत आपल्या-आपल्या प्रभागात विद्यार्थ्यांची मतदान जनजागृती रॅली काढण्यात येणार आहे. याच दिवशी सकाळी १०.०० वाजता पालक सभा घेऊन मतदानाबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

## प्रचारात आघाडी घेण्यासाठी भाजप व काँग्रेसमध्ये चढाओढ

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**



**चंद्रपूर दि.६ :** महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत प्रचारात आघाडी घेण्यासाठी भाजप आणि काँग्रेसमध्ये जोरदार चढाओढ सुरू झाली आहे. प्रत्येक प्रभागात आपली ताकद दाखवण्यासाठी दोन्ही प्रमुख पक्षांकडून आक्रमक प्रचार राबवला जात असून शहरातील राजकीय वातावरण तापले आहे.

भाजपकडून प्रचारासाठी मोठ्या प्रमाणावर रॅली, मोटारसायकल फेऱ्या, प्रचार वाहनांवरील घोषणाबाजी आणि डोअर टू डोअर संपर्कावर भर देण्यात येत आहे. केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचा उल्लेख करत विकासाच्या मुद्यावर मतदारांचे मन वळवण्याचा प्रयत्न भाजप उमेदवारांकडून केला जात आहे. तसेच संघटनात्मक ताकद दाखवण्यासाठी वरिष्ठ नेत्यांचे दौरे, बैठकांवरही लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.

दुसरीकडे काँग्रेसकडूनही प्रचारात कोणतीही कसर सोडली जात नसून स्थानिक प्रश्न, नागरिकांच्या समस्या, महागाई, बेरोजगारी आणि महापालिकेच्या कारभारावर टीका करत मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न सुरू आहे. कोपरा सभा, घराघरांत भेटी, महिला व युवकांचा प्रचारात वाढता सहभाग काँग्रेसकडून दिसून येत आहे.

शहरातील अनेक प्रभागांत दोन्ही पक्षांचे प्रचार एकाच वेळी सुरू असल्याने थेट सामना पाहायला मिळत आहे. झेंडे, बॅनर, लाऊडस्पीकर आणि सोशल मीडियावरील प्रचारामुळे पक्षांमध्ये स्पर्धा अधिक तीव्र झाली आहे. काही ठिकाणी समर्थकांमध्ये शाब्दिक चकमकीही झाल्याचे चित्र आहे.

दरम्यान, निवडणूक प्रशासनाकडून प्रचारावर बारकाईने लक्ष ठेवले जात असून आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही यासाठी सतर्कता बाळगण्यात येत आहे. मनपा निवडणुकीसाठी आता काहीच दिवस उरले असून प्रचारात आघाडी कोण घेणार, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

### प्रचारासाठी गल्लोगल्ली गोंगाट, पक्ष एकमेकांसमोर

महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराने आता शिगेला पोहोचताच शहरातील गल्लोगल्ली राजकीय गोंगाटाने भरून गेली आहे. विविध पक्षांचे उमेदवार आणि कार्यकर्ते थेट रस्त्यावर उतरल्याने प्रत्येक प्रभागात पक्ष एकमेकांसमोर उभे ठाकल्याचे चित्र दिसून येत आहे.प्रचार वाहनांवरील लाऊडस्पीकर, पक्षगीतं, घोषणाबाजी आणि झेंडे-बॅनरमुळे शहरातील वातावरण पूर्णपणे निवडणूकमय झाले आहे. काही भागात एकाच वेळी दोन-तीन पक्षांचे प्रचार सुरू असल्याने आरोप-प्रत्यारोप, घोषणांमधील चढाओढ आणि समर्थकांमधील शाब्दिक वादही पाहायला मिळत आहेत. त्यामुळे नागरिकांना दैनंदिन कामकाजात अडथळे येत असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.दरम्यान, निवडणूक प्रशासनाकडून आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन करण्यात आले असून लाऊडस्पीकरच्या वेळेचे उल्लंघन, परवानगीशिवाय रॅली काढणे यावर कारवाईचे संकेत देण्यात आले आहेत.

## नायलॉन मांजा विक्री व वापरणाऱ्यां विरोधात सक्त कारवाई करा - जिल्हाधिकारी

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**



**चंद्रपूर दि.६ :** दरवर्षी नायलॉन मांजामुळे अनेक लोक जखमी होतात किंवा काही जणांचा मृत्यु होतो. याला सर्वस्वी जबाबदार नायलॉन मांजा विक्री करणारे आणि ते वापरणारे आहेत. त्यामुळे अशा लोकांविरुध्द सक्त कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी संबंधित यंत्रणांना दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त पोलिस अधिक्षक ईश्वर कातकाडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कल्पना क्षीरसागर, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, उपविभागीय अधिकारी विशालकुमार मेश्राम, तहसीलदार विजय पवार, मनपा उपायुक्त चिद्रावार, दूरदृष्यप्रणालीद्वारे सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आदी उपस्थित होते.यावेळी जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, नायलॉन मांजाच्या वापरावर बंदी असून त्याच्या सर्रास वापरामुळे दरवर्षी अनेक नागरिक गंभीर जखमी होतात तर काहींना जीवही गमवावा लागतो. यासाठी नायलॉन मांजा वापरणारे तसेच त्याची विक्री करणारे विक्रेते जबाबदार आहे. नायलॉन मांजाचा वापर अतिशय धोकादायक आहे. अशा विक्रेत्यांविरोधात सक्त कारवाई करावी. त्यासाठी संयुक्त पथके तयार करावी. बाजारात किंवा विक्री होत असलेल्या भागात नियमित गस्त घालावी. प्रत्येक तालुक्यात जास्तीत जास्त कारवाई करणे अपेक्षित आहे.केलेल्या कारवाईचा अहवाल जिल्हा प्रशासनाला सादर करावा, अशा सुचना त्यांनी दिल्या.

## अरुण धोटे यांचा नगराध्यक्षपदी भव्य पदग्रहण सोहळा

### माजी आमदार ॲड.वामनराव चटप आणि सुभाष धोटे यांची उपस्थिती

**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**



**राजुरा दि.६ :** राजुरा नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी अरुणभाऊ धोटे यांनी नगर परिषद सभागृह, राजुरा येथे अधिकृतपणे पदभार स्वीकारला. उत्साह, जल्लोष आणि जनसमुदायाच्या उपस्थितीत पार पडलेला हा पदग्रहण सोहळा राजुरा शहरासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला. या गौरवपूर्ण प्रसंगी नगराविकास आघाडीचे शिल्पकार, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार सुभाषभाऊ धोटे, शेतकरी संघटनेचे नेते माजी आमदार ॲड. वामनराव चटप, तसेच नगरविकास आघाडीचे प्रमुख नेते, पदाधिकारी आणि सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांची उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या उपस्थितीने सोहळ्याचे औचित्य अधिकच वाढले. या सोहळ्यापुर्वी नवनिर्वाचित नगराध्यक्ष अरुणभाऊ धोटे यांनी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आ. सुभाषभाऊ धोटे आणि निवडक कार्यकर्त्यांसह राजुराचे आराध्य दैवत भवानी माता मंदिर येथे मातेचे दर्शन घेऊन आशिर्वाद घेतले.

पदग्रहण सोहळाला मुख्याधिकारी विवेक चौधरी, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष रंजन लांडे, शहराध्यक्ष हरजीतसिंग संधू, शेतकरी संघटनेचे युवक प्रदेशाध्यक्ष ॲड. दिपक चटप, तालुकाध्यक्ष कपिल इददे, राजेंद्र डोहे, नगरसेवक स्वप्नील गजानन मोहुर्ले, सिद्धार्थ आस्तिक पथाडे, मंगला पुरुषोत्तम मोकळे, पौर्णिमा गणपत सोयाम, ईश्वर सुधाकर ठाकरे, नीता किशोर बानकर, फरीना शाकीर सय्यद, इंदुबाई विठ्ठल निकोडे, रमेश काशिनाथ नळे, पुनम सारंग गिरसावळे, वङ्कामाला अजय बतकमवार, दिलीप मुर्लीधर डेकर, संध्या चंद्रशेखर चांदेकर, अनंतकुमार गजानन ताजने, अनु हरजितसिंग संधू, गीता सिद्धार्थ पथाडे, शेख मोहम्मद जुबेर मो. इस्माईल, एजाज अहमद, किशोर हिंगणे यासह नगरविकास आघाडीतील सर्व घटक पक्षांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच राजुरा शहरातील मायबाप नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नूतन नगराध्यक्षांना शुभेच्छा दिल्या. सर्वसामान्यांच्या अपेक्षा, शहरविकासाची नवी दिशा आणि लोकाभिमुख कारभाराची आशा व्यक्त करत उपस्थितांनी आनंदोत्सव साजरा केला. नवीन नेतृत्वाखाली राजुरा शहराच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल, नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविल्या जातील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. पदग्रहण सोहळ्याने राजुरा नगरपरिषदेच्या कार्यकाळाला नवी ऊर्जा आणि सकारात्मक प्रारंभ मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## निबंध स्पर्धेत ५ हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

### स्वीप अंतर्गत मनपाची जनजागृती

**युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी**



**चंद्रपूर दि.६ :** चंद्रपूर महनगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर मतदानाची जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत मनपा व खाजगी अश्या ५० शाळा मिळून जवळपास ५ हजार विद्यार्थ्यांनी भाग घेतला. स्वीप अभियानांतर्गत विविध जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून 'चंद्रपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ व माझे कर्तव्य' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर निबंध स्पर्धेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण करणे, मतदानाचे महत्त्व अधोरेखित करणे तसेच भावी मतदार म्हणून त्यांची जबाबदारी समजावून सांगणे हा होता.या निबंध स्पर्धेत चंद्रपूर महनगरपालिकेच्या शाळांसह शहरातील खाजगी शाळांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. एकूण ५० शाळांमधील सुमारे ५,००० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवून लोकशाही प्रक्रियेबाबत आपले विचार मांडले. विद्यार्थ्यांनी आपल्या निबंधातून मतदानाचा अधिकार, नागरिकांचे कर्तव्य, स्वच्छ व निर्भीड निवडणूक प्रक्रिया तसेच लोकशाही सुदृढ करण्यामध्ये मतदारांची भूमिका यावर प्रभावीपणे प्रकाश टाकला.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मतदनाबाबत जागरूकता निर्माण झाली असून, ते आपल्या कुटुंबीयांपर्यंतही मतदानाचा संदेश पोहोचवतील, असा विश्वास महापालिका प्रशासनाने व्यक्त केला आहे. पुढील काळातही एस्ईप अभियानांतर्गत विविध जनजागृती उपक्रम राबवून नागरिकांमध्ये मतदानाविषयी जागरूकता वाढविण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## जिल्ह्यात १५ जाने. ते ७ फेब्रु. दरम्यान सिकलसेल ॲनेमिया विशेष अभियान

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.६ :** जिल्ह्यात सिकलसेल ॲनेमिया विशेष अभियान १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या निर्देशानुसार या अभियानासाठी जिल्हास्तरावर व्यापक पूर्वतयारी व नियोजन पूर्ण करण्यात आले आहे. सिकलसेल आजाराचा प्रतिबंध व नियंत्रण राखण्यासाठी या कालावधीत विशेष जनजागृती, तपासणी व समुपदेशन मोहीम राबविण्यात येणार आहे.

४० वर्षपर्यंतच्या वयोगटातील सर्व नागरिकांची सिकलसेल तपासणी रुग्ण व वाहकाची नोंदणी आवश्यकतेनुसार इलेक्ट्रोफोरेसीस चाचण्या तसेच रुग्णांना उपचार व समुपदेशन देण्यात येणार आहे. भावी पिढीतील आजाराचे प्रमाण कमी करण्यासाठी विवाहपूर्व व प्रसूती पूर्व समुपदेशन सत्राचे आयोजन ही करण्यात येणार आहे. ही मोहीम अधिक परिणामकारक करण्यासाठी जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्र मध्ये आवश्यक मनुष्यबळ व तपासणी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. जनजागृतीसाठी पोस्टर, पत्रके, सोशल मिडिया, गृहभेटी, आदि माध्यमांचा वापर केला जाणार आहे.ही मोहीम जिल्हाधिकारी विनय गौडा व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण आरोग्य यंत्रणा सज्ज आहे. सर्व नागरिकांनी या विशेष मोहिमेचा लाभ घेऊन सिकलसेल तपासणी करून घ्यावी व सिकलसेल मुक्त चंद्रपूर जिल्हा घडविण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे यांनी केले आहे.

## रुग्णालयात फळवाटपातून पत्रकार दिन साजरा

### महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, भद्रावती शाखेचा सामाजिक उपक्रम



**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती दि.६ :** मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त ६ जानेवारी रोजी पत्रकार दिन साजरा करण्यात आला.

आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण या पहिल्या मराठी वृत्तपत्राच्या माध्यमातून समाजप्रबोधन, सत्यनिष्ठा आणि निर्भीड पत्रकारितेचा भक्कम पाया घातला. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत आजचे पत्रकार समाजातील वास्तव मांडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत असून पत्रकारितेची सामाजिक जबाबदारी अधिक बळकट करण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली.

पत्रकार दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई तालुका शाखा भद्रावती यांच्या वतीने ग्रामीण रुग्णालय, भद्रावती येथे रुग्णांना फळवाटप करून पत्रकार दिन साजरा करण्यात आला.यावेळी कार्यक्रमास वैद्यकीय अधिकारी डॉ. मनीष सिंग व रुग्णालयातील कर्मचारी उपस्थित होते. तसेच महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, भद्रावती शाखेचे पदाधिकारी सुनील दैदावार, शाम चटपल्लीवार, संतोष शिवणकर, महेश निमसटर, पुंडलिक येवले, अनिल इंगोले, विनोद वांढरे आदी पत्रकार बंधू उपस्थित होते.या उपक्रमातून पत्रकारितेची सामाजिक बांधिलकी अधोरेखित करत लोकहितासाठी सत्य व निस्पक्ष पत्रकारिता करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## भिसी पोलीस स्टेशन तर्फे पोलीस स्थापना दिवस साजरा



**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**

**चिमूर दि.६ :** तालुक्यातील भिसी पोलीस स्टेशन अंतर्गत (रायझिंग डे) रांगोळी स्पर्धा, रक्तदान शिबिर, नागरीकांना पोलीस स्टेशन कामकाज, नविन कायदे, सायबर क्राईम, लैंगिक गुन्हे, वाहतुक नियम व सुरक्षा संबंधाने जनजागृती/मार्गदर्शन करुन पोलीस स्थापना दिवस साजरा करण्यात आला.

पोलीस स्टेशन भिसीतर्फे ५ जानेवारी रोजी पोलीस स्टेशन भिसी चे परीसरात शाळकरी मुलांकरीता रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात येऊन, त्यांना प्रथम, व्दितिय व तृतिय पारीतोषिक देण्यात आले. व सहभागी स्पर्धकांना प्रशस्तीपत्र देऊन त्यांना गौरविण्यात आले. तसेच त्यांना गुड टच, बैड टच बाबत, सायबर क्राईम, वाहतुकीचे नियम व सुरक्षा, याबाबत माहीती देण्यात आली.

तसेच ६ जानेवारी रोजी पोलीस स्टेशन चे आवारात जिवनज्योती ब्लॅड बँक नागपुर यांचेकडुन रक्तदान शिबिराचे आयोजन करुन, पोलीस स्टेशनचे अधिकारी/अंमलदार, पोलीस पाटील, होमगार्ड व नागरीकांनी रक्तदान करुन पोलीस स्थापना दिवस साजरा करण्यात महत्वाचा वाटा उचलला. पोलीस पाटील, होमगार्ड, व नागरीकांना पो.स्टे. चे कामकाज, सायबर गुन्हे, नविन अंमलात आलेले कायदे, वाहतुक नियम व सुरक्षा, लैंगिक अत्याचार संबंधी गुन्हे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पो.स्टे. हद्दीत गहाळ झालेले एकुण ११ मोबाईल फोन चा शोध घेऊन ११ मोबाईल मुळ मालकांचे स्वाधिन करण्यात आले. भिसी पोलीसांनी पोलीस स्थापना दिवसानिमीत्य (रायझिंग डे) राबविलेल्या स्पर्धा, जनजागृती, मार्गदर्शन बद्दल पोलीस स्टेशन हद्दीतील नागरीकांनी पोलीसांचे आभार मानले.

पोलीस अधिक्षक चंद्रपुर, मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधिक्षक, इश्वर कातकडे सा. मा. उपविभागीय पोलीस अधिकारी चिमुर दिनकर ठोसरे यांचे मार्गदर्शनात ठाणेदार मंगेश भोंगाडे, पोउपनि रविंद्र वाघ, पोउपनि भारत थिटे, व पो.स्टे. भिसी चे अंमलदार यांनी पोलीस स्थापना दिवस (रायझिंग डे) यशस्वीरित्या साजरा करण्यात आले.मोलाची भूमिका बजावली.

## जल जिवन मिशन योजना अंतर्गत कामांची सखोल चौकशी करा

**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**

**चिमूर दि.६ :** येथील पाणीपुरवठा योजना अडीच वर्षांपासून सुरू असूनही एकाही घराला पाणी मिळाले नाही.यामुळे संबंधित अधिकाऱ्यांच्या चुकीच्या अहवालाबाबत व अनियमिततेबाबत तातडीची चौकशी करुन तत्सम सर्व अभियंतावर उचित कार्यवाही करण्याची मागणी उपसरपंच अशोक चौधरी यांनी चंद्रपूर जिल्हाधिकारी व चंद्रपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे.

उपसरपंच अशोक चौधरी यांनी निवेदनात म्हटले आहे की,मी ग्रामपंचायत शंकरपूर येथील लोकानियुक्त उपसरपंच या नात्याने तसेच ग्रामस्थांचा प्रतिनिधी म्हणून अत्यंत गंभीर व जिव्हाळ्याचा प्रश्न आपल्या निदर्शनास आणून देत आहे. मौजा शंकरपूर गावामध्ये 'हर घर नल - हर घर जल' अंतर्गत पाणीपुरवठा योजना गेल्या अडीच वर्षांपासून सुरू आहे,परंतु आजतागायत एकाही घराला प्रत्यक्ष पाणीपुरवठा झालेला नाही,ही बाब अत्यंत चिंताजनक असल्याचे म्हटले आहे.



## अपयशातही यशाचा संकल्प करण्याची मानसिकता विद्यार्थ्यांमध्ये तयार करा

### आ.सुधीर मुनगंटीवार यांचे शिक्षक-प्रशिक्षकांना आवाहन, उथळपेठ येथे बीट स्तरीय बाल क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.६ :** क्रीडा स्पर्धा म्हटल्यावर एकाचा विजय होणार तर दुसऱ्याचा पराभव होणार. पण अपयश आल्यानंतर दुसऱ्याच्या यशामध्ये आनंद शोधता आला पाहिजे. अपयशातच यशाचा संकल्प मनात करण्याची आणि उद्याचा दिवस माझा असेल असा निर्धार करण्याची मानसिकता विद्यार्थ्यांमध्ये तयार करण्याची जबाबदारी शिक्षक-प्रशिक्षकांनी पार पाडावी, यातूनच विद्यार्थी घडत असतो, असे प्रतिपादन राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी आज, मंगळवार, दि. ६ जानेवारी रोजी उथळपेठ येथे केले. उथळपेठ येथे बीट स्तरीय बाल क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.



यावेळी उथळपेठ ग्रामपंचायतचे सरपंच पलिंद्र सातपुते, मुल पंचायत समितीचे गटविकास अधिकारी किशोर शिंदे, गटशिक्षणाधिकारी जयश्री गुज्जनवार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गिरधर चिचघरे, उपाध्यक्ष गणेश चिचघरे, उपसरपंच भारती पिंपळे, ग्रामपंचायत सदस्य मीनाक्षी बुरांडे, अर्चना चिचघरे, श्रीकांत बुरांडे, सुरेंद्र चिचघरे, वर्षा वाढई, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष गोपाल चिचघरे, शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्य शितल बुरांडे, ज्योत्स्ना वाडगुरे, निलेश बुरांडे, प्रवीण सातपुते, अल्का शेडमाके, रोशन चिचघरे, पोलीस पाटील भाग्यश्री चिचघरे, उथळपेठ ग्रामपंचायत सचिव साईनाथ कंबलवार, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर खाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

तीन दिवसीय या स्पर्धेमध्ये चिचाळा बीटातील २१ शाळांमधील सुमारे २०० विद्यार्थ्यांनी घेतलेला उत्स्फूर्त सहभाग घेतल्याबद्दल आमदार श्री. मुनगंटीवार यांनी कौतुक केले. विशेष म्हणजे आ. मुनगंटीवार यांनी स्पर्धेसाठी विशेष बक्षीस जाहीर केली.आ. मुनगंटीवार म्हणाले, 'राज्यात उथळपेठ गावाने १०० टक्के सोलार ग्राम म्हणून निर्माण केलेली ओळख कौतुकास्पद आहे. सुसज्ज ग्रामपंचायत इमारत आणि गावातील भौतिक सुविधा तसेच सीसीटीव्ही कॅमेरा व्यवस्था यांसाठी उथळपेठला आयएसओ प्रमाणपत्र प्राप्त झाले. माझ्या बल्लारपूर मतदारसंघातील गाव असल्याचा मनापासून अभिमान आहे. हे सर्व गावकऱ्यांच्या एकजुटीचे जिवंत उदाहरण आहे. आता उथळपेठ या ऊर्जाग्राममधून ज्ञानाची ऊर्जा आणि प्रेमाची उब घेऊन उथळपेठ येथील विद्यार्थी मोठी स्वप्ने पाहत आहे. आपल्या क्रीडा कौशल्यातून उथळपेठ गावाचा व बल्लारपूर मतदारसंघाचा मान वाढविण्यात निश्चित यशस्वी होईल असा विश्वास आहे.पहिल्यांदा गावे छोटी होती, पण माणसाचे मन मोठे होते. आता गावे मोठी झाली, पण माणसांची मने छोटी झाली. पण उथळपेठ गाव त्याला अपवाद आहे. हे गाव तर मोठे होतच आहे, शिवाय येथील मनही मोठे आहे, असेही ते म्हणाले.

## वृद्ध वडिलांना शेजाऱ्याची मारहाण

**•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ, प्रतिनिधी, दि.६ जानेवारी**

ग्रामीण पोलीस ठाण्यांतर्गत येणा-या भोयर गावात एका ६० वर्षीय वृद्धाला मारहाण झाल्याची घटना घडली आहे. फिर्यादी रामदास लुंगसे हे आपल्या अंगणात बसले असताना, शेजारी राहणारा आरोपी शुभम ओंकार सहारे हा दारू पिऊन आला. त्याने फिर्यादीच्या मुलाने दुस-याला पार्टी दिली पण आपल्याला दिली नाही, या कारणावरून वाद घातला. वादाचे रूपांतर शिवीगाळ आणि मारहाणीत झाले. आरोपीने हातातील लाकडी काठीने रामदास लुंगसे यांच्या हातावर प्रहार करून त्यांना जखमी केले. या प्रकरणी ग्रामीण पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

युवाराष्ट्र दर्शन

-: कार्यालयीन पत्ता :-
गुलमोहरी सोसायटी, दाते कॉलेज रोड, जुना उमरसरा, यवतमाळ ४४५००१

-: जिल्हा प्रतिनिधी :-
संजय सावरकर मो. ९४२१८४४८७०
* एजन्सीसाठी संपर्क
ई-मेल ssawarkar43@gmail.com

## संक्षिप्त

### व्हेंटिलेटरच्या काचा फोडून चोरीचा प्रयत्न

**•युवाराष्ट्र दर्शन आर्णी :**
तालुक्यातील लोणी येथे चोरीचा एक प्रयत्न फसला आहे. फिर्यादी प्रतिभा वामन गायधने यांच्या घरी आरोपी लखन प्रमोद रामटेके (२२) याने ४ जानेवारी रोजी सकाळी घरफोडीचा प्रयत्न केला. आरोपीने घराच्या व्हेंटिलेटरच्या काचा काढून आणि तारेची जाळी तोडून घरात प्रवेश केला. मात्र, चोरीचा प्रयत्न यशस्वी झाला नाही. याप्रकरणी प्रतिभा गायधने यांनी दिलेल्या तक्रारीवरून आर्णी पोलिसांनी आरोपी लखन रामटेके विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेमुळे परिसरात सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

# एआयचा किती वापर करायचा हे पत्रकारांनी ठरवावे

## नितीन पखाले : काम सोपे होईल, विचार खुंटेल, पत्रकार भवनासाठी सांघिक प्रयत्न हवे

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ६ जानेवारी**

एआयमुळे पत्रकारीता सोपी झाली. मात्र ही कृत्रिम बुध्दीमत्ता पुढील काळात पत्रकारीतेपुढे मोठे आव्हान निर्माण करण्याचा धोका आहे. यामुळे काम सोपे होईल पण विचार क्षमता खुंटेल. यामुळे एआयचा किती वापर करायचा हे आपल्याला ठरवावे लागणार आहे. त्यासाठी आपन आतापासूनच सजग होण्याची आवश्यकता असल्याचे मत जेष्ठ पत्रकार नितीन पखाले यांनी व्यक्त केले. ते महाराष्ट्र राज्य श्रमिक पत्रकार संघाशी संलग्नित यवतमाळ शाखेने आयोजित केलेल्या पत्रकार दिनाच्या कार्यक्रमात मुख्य अतीथी म्हणून बोलत होते.



यवतमाळ मधील केमिस्ट भवनात पत्रकार दिन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार आरती गंधे, मुख्य अतिथी म्हणून तहसिलदार योगेश देशमुख, एलसीबी पथकाचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे, पत्रकार भास्कर मेहरे, श्रमिकचे अध्यक्ष श्रीकांत राऊत, सचिव अमोल ढोणे होते.

नितीन पखाले पुढे बोलतांना म्हणाले, एआय आज सोपे वाटत असल्याने त्याचा उपयोग वाढला आहे. मात्र यातुन बुध्दीमत्ता खुंटण्याचा धोका आहे. तो आपन वेळीच ओळखला पाहिजे. पत्रकारांनी चौकस दृष्टी ठेवली पाहीजे, सर्व निरीक्षण नोंदविली पाहिजे, विचारांना धार असली पाहिजे, एआयचा किती वापर करायचा हे आपन ठरविले पाहिजे. असे ते म्हणाले. यवतमाळातील पत्रकार भवनाचा प्रश्न अनेक वर्षांपासून रेंगाळत आहे. त्यासाठी सर्वांनी सांघिक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. सरकार अनुकूल आहे. मुंबई, पुण्यात पत्रकार भवन आहे. पुढील वर्षीतरी ईमारतीचे काम होईल या दृष्टीने प्रयत्न करायला हवे, असे मत त्यांनी नोंदविले.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना आरती गंधे यांनी यवतमाळातील पत्रकारीता करतांना सर्वांचेच योगदान मोलाचे आहे. महिला पत्रकार असले तरी अधिकारी वर्ग आणि गाव पातळीवरील रिपोर्टींग करतांना कुठल्याही अडचणी आल्या नाही. अनेक विषय निडरपने मांडले आणि पुढे मांडणार आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. याशिवाय पत्रकारीतेत सकारात्मक पत्रकारीता जपायला हवी, परखड मत मांडायला हवे असे त्या म्हणाल्या. यावेळी तहसिलदार योगेश देशमुख म्हणाले, पत्रकारांनी समाजापर्यंत खरी माहिती द्यावी, अनेक वेळा संयमी पत्रकारीता आवश्यक असते. सामाजिक कार्यात पत्रकारांचा सहभाग असतो. तो असाच कायम असायला हवा असे ते म्हणाले. यावेळी एलसीबी पीआय सतिश चवरे म्हणाले लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ पत्रकार आहे. आपल्याकडून प्रश्न येने अपेक्षित आहे. जनतेचे प्रश्न मांडायला हवे असे ते म्हणाले. यावेळी भास्कर मेहरे यांनी पत्रकारांचा एकोपा कायम राहू द्या असे आवाहन केले. याप्रसंगी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत राऊत यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची रुपरेशा मांडली. कार्यक्रमाचे संचालन केशव सवळकर यांनी केले तर आभार अमोल ढोणे यांनी मानले.

यावेळी गणेश बयास, लक्ष्मणलाल खत्री, दिनेश गंधे, अशोक गोडंबे, किशोर जुनूनकर, नागेश गोरख, राजकुमार भितकर, आनंद कसंबे, बल्लु भागवते, वीरेंद्र चौबे, अशोक बानोरे, गणेश राऊत, सुरेंद्र राऊत, चेतन देशमुख, निलेश फाळके, प्रविण देशमुख, संजय सावरकर, अमोल शिंदे, समीर मगरे, रुपेश उत्तरवार, श्याम वाढई, पवन लताड, मयूर वानखेडे, अनिकेत कावळे, विवेक गोगटे, सतिश बाळबुधे, तुषार देशमुख, मयुरेश शर्मा, रवि राऊत, विजय बुंदेला, राहुल पाटील, राहुल वासनिक, नितीन राऊत, अतुल राऊत, नितीन भुसरेड्डी, मकसुद अली, किरण कोरडे, विजय मालखेडे, शाकीर अहेमद, रुपेश चाफलकर, विजयकुमार गाडगे, हेमराज बंड, यांच्यासह अनेकजन उपस्थित होते.

## शिक्षक व कर्म, सह. पतसंस्था मर्या. दिग्रस र.नं. ६०२ चा त्या आपसी व्यवहाराशी संस्थेचा कोणताही संबंध नाही

### दिग्रस पतसंस्थेच्या व्यवस्थापकांनी दिला खुलासा

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, दिग्रस, दि. ६ जानेवारी**

एका वर्तमानपत्रामध्ये दि. ०२ जानेवारी २०२६ ला जि. प. शिक्षक व कर्म, सह. पतसंस्था मर्या. दिग्रस र.नं. ६०२ या पतसंस्थेच्या विरोधात कथीत बातमी प्रकाशीत झाल्याचे समाजमाध्यमावरुन ज्ञात झाले, सदर कथित बातमीमध्ये प्रकाशोत झालेला मजकुर संपूर्णतः दिशाभूल करणारा आहे, या कथीत बातमीमध्ये नमुद आर्थिक व्यवहार विश्वांजली व्हेंचर्स एल.एल.पी. या कंपनीच्या संचालीका श्रीमती पुष्पांजली दिनेश रंधेरीया व संस्थेचे सभासद गिरीष किसनराव दुधे यांच्यामधील परस्पर आपसी आर.टी.जी.एस. व्यवहार आहे, त्या आपसी व्यवहाराशी संस्थेचा कोणताही संबंध नाही तसेच आमची पतसंस्था ही पगारदार पतसंस्था असून फक्त जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत येणारे कर्मचारी व शिक्षक जे संस्थेचे सभासद आहे त्यांनाच पगारानुसार कर्ज पुरवठा करते त्यामुळे सदर बातमीत नमुद कथीत कंपनीला तथा व्यक्तीला कर्ज पुरवठा करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. कथीत बातमीमध्ये विश्वांजली व्हेंचर्स एल.एल.पी. च्या संचालीकेनी रामनगर पोलीस स्टेशन, वर्धा येथे तक्रार दिल्याचे नमुद आहे.

यावरुन बातमीमध्ये नमुद कथित आर्थिक व्यवहाराशी पतसंस्थेचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष कोणताही संबंध नसतानाही निव्वळ पत्तसंस्थेची बदनामी करुन त्यामध्ये विनाकारण गोवण्याचा प्रयत्न केला आहे, पतसंस्थेची नाहक बदनामी करणा-या संबंधीत कंपणी व संचालिकेविरद्ध संस्थेने कायदेशीर कार्यवाही सुरु केली आहे. तरी संस्थेची आर्थिक स्थिती भक्कम असून सर्व व्यवहार नियमानुसार व पारदर्शक पद्धतीने सुरु आहेत संस्थेच्या सर्व सभासद ठेविदारांनी कोणत्याही खोटया अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पतसंस्थचे अध्यक्ष तथा सर्व संचालक मंडळाने केला आहे.

## महिला कर्मचा-यांच्या मातेचा सन्मान



**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, पांढरकवडा, दि. ६ जानेवारी**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त पांढरकवडा आगारातर्फे महिला कर्मचारी यांच्या मातेचा सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आगार व्यवस्थापक अविनाश काकडे तर प्रमुख पाहुणे म्हणून मोहोळ, वैदही मॅडम, पेंदोर, ज्येष्ठ महिला वाहक नीमसरकार उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस हार अर्पण व दीप प्रज्वलित करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर सन्मान मातेचा हा कार्यक्रम सुरू करण्यात आला व कार्यक्रमाला उपस्थित सर्व महिला कर्मचाऱ्यांच्या आईचे शाल.स्मृतिचिन्ह. पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमांमध्ये आगार व्यवस्थापक अविनाश काकडे यांनी सुद्धा सर्व महिलांना जयंतीच्या शुभेच्छा देऊन सर्व महिलांना मोलाचे मार्गदर्शन केले.वाहक मंगेश यांनी मोलाचे महिलांना मार्गदर्शन केले. यावेळी सीमा डेरे, प्रतिभा गेडाम, अयोध्या बोरकर, पद्मा फूसाटे, शिल्पा टेकाम, नंदिनी सलामे, दुर्गा राऊत महीला कर्मचारी व पुरुष कर्मचारी उपस्थित होते.सदर कार्यक्रमांमध्ये आपल्या पांढरकवडा आगाराची पहिली महिला चालक वाहक सोनल देवकते हिचा सत्कार करण्यात आला, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना बाराहाते वाहक हिने केले तर कार्यक्रमाची प्रस्तावना सीसले, नेहारे मॅडम यांनी केले

## चिखलगाव ग्रामपंचायतला बदनाम करण्याचा विरोधिकांचा कुटील डाव

### - उपसरपंच सुनील कातकडे

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, वणी, दि. ६ जानेवारी**

वणी तहसील मध्ये सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेली चिखलगाव ग्रामपंचायत मागील 20 वर्षापासून विकास कामात अग्रेसर आहे परंतू काही ग्रामपचांयत मधील सदस्य कुटील डाव खेळून चिखलगाव ग्रामपंचायतीला बदनाम करण्याचा कट करीत आहे. मात्र गावाच्या विकासासाठी सर्व सदस्यांनी हेतुपुरस्सर विरोध न करता सोबत राहणे गरजेचे आहे असे मत उपसरपंच सुनील कातकडे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केले आहे.

१८ सदस्य असलेल्या चिखलगाव ग्रामपंचायत मध्ये ८ सदस्यांनी नुकताच राजीनामा दिलेला आहे. मात्र काम करत असतात मतभेद होत असते परंतु या मतभेदाचा नेमका फायदा विरोधकांनी त्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून गावविकासाच्या कामाला कुठेतरी खिळ घालण्याचा प्रयत्न केला जात आहे परंतु गावाच्या विकासासाठी काल पर्यंत आम्ही सर्व एक होतो आणि उद्याही आम्ही एकत्रच राहणार आणि विरोधकांनी रचलेला डाव, षडयंत्र आम्ही हाणून पाडु आणि आमच्यामधील मतभेद, नाराजी दूर करुन गावविकासाचे काम करु असेही त्यांनी म्हटले आहे. गावाचा सर्वांगीण विकास करणे , ग्रामस्थांच्या मुलभूत गरजा पूर्ण करणे हे काम माझे किंवा ग्रामपंचायत सदस्य, सरपंच,



उपसरपंच यांचेच नसून विरोधकांची ही साथ तेवढीच महत्त्वाची आहे. अशा पद्धतीने आमच्याच कार्यकारिणी मध्ये दुफळी निर्माण करण्याकरिता शक्ती लावण्यापेक्षा विरोधकांनी आमच्या सोबत घेऊन ग्रामविकासाला हातभार लावावा असे आवाहन उपसरपंच सुनील कातकडे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.

## मतिमंद विद्यार्थ्यांच्या दुःखामध्ये पत्रकारांनी शोधला आनंद - रसुल पटेल

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधि उमरखेड, दि. ६ जानेवारी**

पत्रकारांची नजर ही दुर्लक्षित घटकावर राहत असल्यानेच त्यांनी मतिमंद चिमुकल्यांच्या दुःखामध्ये ' पत्रकार दिनी ' आनंद शोधून मन समाधान केले असल्याचे प्रतिपादन काँग्रेसचे नवनिर्वाचित नगरसेवक रसूल पटेल यांनी केले .

महात्मा फुले दैनिक पत्रकार संघाच्या वतीने श्री शिवाजीराव मोघे मतिमंद निवासी विद्यालयात आयोजित पत्रकार दिनानिमित्त कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार राजाभाऊ गाजेगावकर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना उबाठा उपजिल्हा संघटक डॉ. अजय नरवाडे, म.फु.दै. पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष मुडे



, सचिव स्वपनील मगरे, विद्यालयाचे संचालक सचीन निलपवार, प्रविण सुर्यवंशी, दत्तात्रय काळे, राजु गायकवाड, सुनिल ठाकरे, शाहरुख पठाण हे उपस्थित होते.

आज पत्रकार दिनानिमित्त मतिमंद विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाद्यपदार्थ वाटप करून खऱ्या अर्थाने पत्रकारांनी माणुसकी जपली आहे असे सांगून रसूल पटेल यांनी सांगितले.

यावेळी प्रवीण सूर्यवंशी, राजाभाऊ गांधी गावकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले तर प्रस्ताविकात राजु गायकवाड यांनी दरवर्षी पत्रकार दिन साजरा होत असून यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष संतोष मुडे यांच्या संकल्पनेतून हा समाजशील उपक्रम राबविल्याने समाज प्रवाहाच्या बाहेर असलेल्या मतिमंद विद्यार्थ्यांसाठी हा एक प्रयत्न असल्याचे आवर्जून सांगितले. संचलन मुख्याध्यापक विनोद मुटकूळे यांनी केले तर यावेळी शिक्षक अशोक चव्हाण, गणपती नरवटे, आशा तायडे, संजय आमटे, नवनाथ देशमुख, कविता गायकवाड, पंकज खंदारे, प्रणिता कवटिकवार, संदिप लिहितकर , अनुप गोमासे, सुदर्शन जाधव व विदयार्थी उपस्थित होते .

## शाळा व्यवस्थापन समितीची निवड

### अध्यक्षपदी संदीप भाउराव पाईकराव, व उपाध्यक्ष पदी श्रीमती दर्शना विठ्ठल वायकोळे

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधि ढाणकी, दि. ६ जानेवारी**

ढाणकी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेची व्यवस्थापन समितीची नविन कार्यकारणी पालक सभेतुन निवड करण्यात आली. व तसेच नवनिर्वाचित समितीचा पदग्रहण सोहळा पार पडला व शाळा समिती अध्यक्ष पदाची निवड करण्यात आली. अध्यक्ष पदी संदिप भाउराव पाईकराव, उपाध्यक्ष पदी श्रीमती दर्शना विठ्ठल वायकोळे यांची निवड करण्यात आली समिती सदस्य म्हणून साहेबराव गायकवाड, शेख अफरोज, सचिन आरेवाड, मनीष पाईकराव, सीमा पराते, रूपेश शिंदे, हर्षदा नलावडे,



कांचन गुंडेवार, सीमा परविन, चंद्रमणी पाईकराव यांची निवड करण्यात आली. शिक्षण तज्ञ म्हणून विठ्ठल वायकोळे यांची निवड करण्यात आली. समारोप प्रसंगी नविन शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने माजी [जुन्या] समितीचा सत्कार करण्यात आला त्यावेळी श्रीमंती मुख्याध्यापीका ज्योती बलाळ [गोपेवाड], भावना निमजे , चित्रलेखा भुजाडे, शाहीन हमीद सय्यद, सुनिता लुटे, पुष्पा कल्यानकर, देवसिग पडवाळे , सुशील पवार यांची उपस्थिती होती

## गटनेते पदी चैताली बेलोकर



**यवतमाळ- शिवसेनेच्या गटनेते पदी चैताली निलेश बेलोकर यांची निवड पालकमंत्री संजय राठोड, पश्चिम विदर्भ सन्मनव्यक पराग पिंगळे जिल्हा प्रमूख गजानन डोमाळे, शिवसेना नेते सुरेश चिंचोळकर यांच्या उपस्थितीत करण्यात आली.**

**CHANGE OF NAME**
OLD NAME
AS PER PASSPORT NO: N3529266
**RIZWANA BEGUM FIROJ SHEIKH**
NEW NAME
AS PER ADHAR & PAN CARD
**RIJAWANA FIROJ SHEIKH**
ADDRESS: Behind Vidya Niketan School Digras
TQ, Digras Dist, Yavatmal

# तहानलेले नागरिक अन् बेजबाबदार नगर प्रशासन

## नगराध्यक्ष पदाचा पदभार सांभाळताच 24 तासाच्या आत मोहीनी नाईक यांना पाण्याचा अपव्यय करीत नगर प्रशासनाची सलामी

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी | पुसद दि. ६ जानेवारी**

शहरातील काही भागांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना रांगा लावाव्या लागत असतांना, दुसरीकडे शहराच्या मध्यवर्ती भागात शुद्ध पेयजल अक्षरशः रस्त्यावर वाहत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले असून स्वच्छ शहर सुंदर शहराचे स्वप्न पहात नगराध्यक्ष पदावर आरुढ झालेल्या मोहिनी नाईक यांना पाण्याचा अपव्यय करीत न.प. प्रशासनाने 24 तासाच्या आतच सलामी दिली आहे.

पुसद नगरपालिकेच्या निष्काळजी आणि बेजबाबदार कारभाराचे हे जिवंत उदाहरण सध्या टिळकनगर परिसरात पाहायला मिळत आहे.



दिनांक 5 जानेवारीच्या सकाळी ४.१९ ते ४.४५ वाजता पर्यंत नगर परिसरातील पाण्याची टाकी ओव्हर फ्लो होऊन धो धो वाहत होती. नवीन वर्ष लागतात मागील पाच दिवसातील ही तिसरी घटना असून या पाण्याच्या अपव्ययाने तेथील नागरिक प्रचंडच राखले असून येणाऱ्या जाणाऱ्यांना सुद्धा प्रचंड प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे.

टिळकनगर येथे असलेली तब्बल २० लाख लिटर क्षमतेची पाण्याची टाकी गेल्या पाच दिवसांपासून रात्रीच्या वेळेस सातत्याने ओव्हरफ्लो होत आहे. टाकी भरल्यानंतर पंपिंग तत्काळ बंद करणे अपेक्षित असताना, संबंधित कर्मचारी आणि अधिकारी मात्र नेहमीप्रमाणे गाफील असल्याचे स्पष्ट झाले आहे. परिणामी, शुद्धीकरण प्रक्रिया पूर्ण झालेले मौल्यवान पेयजल रस्त्यावरून खळाळत वाहत असून, मोतीनगर बगिच्याच्या समोरील संपूर्ण रस्ता जलमय झाला आहे.

पंपिंग पूर्ण झाल्यानंतर टाकीवर नियुक्त कर्मचाऱ्यांनी वेळीच सूचना देणे व पंप बंद करणे, ही त्यांची मूलभूत जबाबदारी आहे. मात्र, गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेला हा प्रकार पाहता, नगर प्रशासनाला पाण्याची किंमत आणि नागरिकांच्या गरजांशी काहीही देणेघेणे नसल्याचे स्पष्ट होते. शुद्ध पेयजलाचा असा उघड अपव्यय सुरू असतांना प्रशासन मात्र गाढ झोपेत असल्याचे चित्र आहे. यातच दिनांक 4 जानेवारी सोमवार रोजी नवनियुक्त नगराध्यक्ष मोहिनी नाईक यांनी आपल्या पदाचा पदभार स्वीकारताना स्वच्छ पाणी सुंदर पुसद स्वच्छ पुसद अशा घोषणा दिल्याने ही घटना घडल्याने नागरिकांमध्ये चर्चेला उधाण येत आहे. दरम्यान, या प्रकाराबाबत काही दिवसांपूर्वी गृहनिर्माण सोसायटीचे अध्यक्ष रवी देशपांडे यांनी पाणीपुरवठा अभियंता माधव पाटील यांच्याशी संपर्क साधून गंभीर बाब निदर्शनास आणून दिली. मात्र, माहिती देऊनही अद्यापही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, ही बाब अधिक संतापजनक आहे. शहरात सध्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष पदारूढ होवून 24 तासच झाले असून मुख्याधिकारी अतुल पंत यांचे अमरावती येथे स्थानांतरण झाल्याने व पुसदला राऊत हे तात्पुरते मुख्याधिकारी दिल्याने पुसद नगरपालिकेला सध्या अक्षरशः वालीच नाही, अशी अवस्था झाली आहे. माजी मुख्यमंत्री कैलासवासी सुधाकरराव नाईक यांना जलसंधारणाचे प्रणेते ही महाराष्ट्राने दिलेली पदवी आहे त्यांच्याच गावात एकीकडे तहानलेले नागरिक आणि दुसरीकडे प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे वाहून जाणारे पाणी, हा विरोधाभास पुसद नगरपालिकेच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे. या प्रकाराबद्दल शहरातील नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि नाराजी व्यक्त होत आहे.

महाराष्ट्र शासन
**तालुका दंडाधिकारी, यवतमाळ यांचे न्यायालय**
Email Id- tahsildaryavatmal@gmail.com दुरध्वनी क्रमांक ०७२३२-२३८१९४

**जाहीर सुचना**
प्रकरण क्रमांक 50 / जन्म-मृत्यु नोदणी/२०२५
मौजा यवतमाळ ता. यवतमाळ

ज्याअर्थी, निबंधक तथा मुख्याधिकारी, यवतमाळ यांनी मौजा यवतमाळ ता. यवतमाळ येथील प्रविण नामदेवराव भिंगोटे यांची दिनांक ३०.०९.१९९० रोजीची मौजा यवतमाळ ता. यवतमाळ येथे झालेली जन्माची नोंद नगर परीषद कार्यालय, यवतमाळ नोंदवहीमध्ये केलेली / झालेली नसल्यामुळे व एका वर्षापेक्षा जास्त विलंब झालेला असल्यामुळे जन्म - मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम १३ (३) अन्वये आदेशास्तव प्रस्ताव या न्यायालयात दाखल केलेला आहे.
त्याअर्थी, सर्वत्र नागरीकांना याव्दारे कळविण्यात येते की, प्रविण नामदेवराव भिंगोटे, रा. वार्ड क्रमांक ०३, पांढरी लोहारा, यवतमाळ यांचे जन्माची नोंद जन्म रजिस्टर मध्ये घेण्याबाबत कोणासही काही आक्षेप वा हरकती असल्यास आपल्या हरकती वा आक्षेप या न्यायायलयात १५ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. विहीत मुदतीत किंवा आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणाच्याही हरकती वा आक्षेप या कार्यालयास प्राप्त न झाल्यास, कोणासही काहीही सांगावयाचे नाही किंवा आक्षेप नाही, असे गृहीत घरुन अर्जदार यांचा जन्म नोंदीचा आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर प्राप्त होणारे आक्षेप वा हरकतीचा ग्राहय धरण्यात येणार नाही. आज दिनांक ०५.०१.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

स्वाक्षरी
(डॉ. योगेश देशमुख)
तालुका दंडाधिकारी, यवतमाळ



## शहराच्या विकासाकरिता पक्षभेद विसरुन काम करा- आमदार कुणावार

### नगराध्यक्ष राणी कलोडे यांच्यासह नगरसेवकांचे पदग्रहण

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

सिंदी ( रे )., दि. ०६

नवीन चमुच्या सर्व सदस्यांनी कोणतेही मतभेद न बाळगता शहराच्या विकासार्थ एकजूट दाखवावी. एकमतांनी घेतलेल्या निर्णयामुळे नगरीचा सर्वांगीण विकास होईल, असे आशीर्वचन आमदार समीर कुणावार यांनी दिले. नवनिर्वाचित नगराध्यक्ष आणि वीस नगरसेवकांच्या पदग्रहण सोहळ्यात ते बोलत होते.

आज सकाळी ९-३० वाजता नवनिर्वाचित नगराध्यक्ष राणी कलोडे तथा हिंगणघाटच्या नगराध्यक्ष डॉ. नयना तुळसकर, आमदार कुणावार समर्थकांसह नगर परिषदेच्या सभागृहात वाजतगाजत पोहचले. तेथे आमदार समीर कुणावार आणि दीड हजार नागरिकांच्या हजेरीत मुख्याधिकारी प्रणोती गावित यांनी राणी कलोडे यांना पदभार सोपविला. पालिकेचा पदभार सांभाळताच निवडणुकीत यशस्वी झालेल्या भाजपाच्या दहा, एक अपक्ष धरुन अकरा आणि कॉंग्रेस व शरद पवार गटांचे नऊ नगरसेवकांचे पुष्पहार अर्पण करुन स्वागत करण्यात आले. आमदार समीर कुणावार यांनी आपल्या भाषणात ग्रामीण रुग्णालयाचा प्रश्न निकालात काढण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस आणि आरोग्यमंत्री यांची भेट घेणार आहे. तसेच पाणी पुरवठा यंत्रणा अद्ययावत करण्यासाठी भक्कम निधी मिळेल याची खात्री बाळगा, असे अभिवचन दिले. यावेळी मंचावर भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, नव निर्वाचित नगरसेवक, सेविका तथा सहयोगी पक्षांचे कार्यकर्ते उपस्थित होते. सोहळ्याचे संचालन भगवंत पवार यांनी केले तर सर्वांचे आभार राणी कलोडे यांनी मानले.

## कारंजा उड्डाणपुलाच्या निकृष्ट कामाची खासदार काळेंकडून दखल

### पुलाला तडे गेल्याने संभाव्य धोका; राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला तात्काळ पत्र

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा, दि. ०६

अमरावती–नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील कारंजा शहरात असलेल्या उड्डाणपुलाला तडे गेल्याची बाब समोर आल्यानंतर खासदार अमर काळे यांनी या गंभीर विषयाची तात्काळ दखल घेतली आहे. पुलावरून मोठ्या प्रमाणात जड वाहतूक सुरू असून हा पूल लोकवस्तीच्या मध्यभागी असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला



आहे. कारंजा येथील सजग नागरिकांनी तसेच माध्यमांत प्रसिद्ध झालेल्या वृत्तांच्या आधारे खासदार अमर काळे यांच्या निदर्शनास ही बाब आणण्यात आली. याबाबीची दखल घेत त्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, नागपूर तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे सचिव, नवी दिल्ली यांना तात्काळ पत्र पाठवले.

या पत्रामध्ये उड्डाणपुलाची तज्ज्ञ तांत्रिक पथकाकडून सखोल तपासणी करून पूल वाहतुकीस सुरक्षित आहे की नाही, याची खातरजमा करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच पूल धोकादायक असल्यास तात्काळ वाहतुकीस बंद करण्यात यावा, असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय, उड्डाणपुलाच्या निकृष्ट कामाची चौकशी करून संबंधित अभियंता व कंत्राटदारांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी खासदार अमर काळे यांनी केली आहे. नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होणार नाही, यासाठी शासन व संबंधित यंत्रणांनी त्वरित पावले उचलावीत, अशा सूचना त्यांनी केल्या.

### हिंगणघाट येथे हद्दपार आरोपीला शस्त्रासह अटक

**वर्धा, :** एक वर्षासाठी हददपार असलेला आरोपी हिंगणघाट शहरात शस्त्रासह फिरत असताना त्याला पोलिसांनी अटक केली,

अज्जू उर्फ मोहन प्रकाश भुसारी (२७) रा. संत चोखोबा वॉर्ड, हिंगणघाट याला एक वर्षासाठी हद्दपार करण्यात आले होते, त्यानंतरही तो शहरात फिरत असल्याची माहिती पोलिसांनी मिळाली, पोलिसांनी काळी सडक रोड, हिंगणघाट येथे ताब्यात घेतले, त्याची अंगझडती घेतली असता मोठा धारदार चाकू मिळून आला, याप्रकरणी त्याला अटक करुन हिंगणघाट पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केला आहे, पुढील तपास सुरू आहे.

## वाळू डेपोतून वाळू चोरी

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

हिंगणघाट, दि. ०६

वाळू डेपोतून वाळू चोरी करणा-या ट्रॅक्टर ट्रॉलीसह दहा लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, ही कारवाई मांडगाव शिवारात करण्यात आली.

मांडगाव येथे वाळूचा शासकीय डेपो आहे, या डेपोला सुरक्षिततेच्या दृष्टीने कूंपन करण्यात आले आहे, मात्र, ३०० फूट कूंपन आणि झुडपे तोडून सुरेश भिमाजी डांगरी रा. मांडगाव याने डेपोतून ट्रॅक्टर (क्रमांक एम. एच. ३२, ए. एच. ३१०९) मध्ये एक ब्रास वाळू ट्रॉलीमध्ये टाकून बाहेर काढली.

यासंबंधात मंडल अधिकारी प्रसार अरुणराव पाचखेडे यांना माहिती मिळताच ट्रॅक्टर ताब्यात घेतले, पाहणी केली असता ट्रॉलीमध्ये एक ब्रास रेती मिळून आली, वाळूसह वाहन जप्त करण्यात आले, याप्रकरणी हिंगणघाट पोलीस ठाण्यात तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील तपास ठाणेदार अनिल राऊत यांच्या नेतृत्वात पोलिस उपनिरीक्षक सुनील राम करीत आहेत.

## शिक्षकेत्तर संघटनेच्या कार्यकारणीची निवड

### जिल्हाध्यक्षपदी वैद्य तर उपाध्यक्ष जवादे



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

आर्वी, दि. ६

वर्धा जिल्हा माध्यमीक शाळा शिक्षकेत्तर संघटनेच्या, जिल्हा कार्यकारणी निवडकरीता. सेवाग्राम येथील महिलाश्रम अध्यापक विद्यालयात आमसभा घेण्यात आली. यात जिल्हाध्यक्ष पदाकरीता आष्टी येथील अनिल वैद्य यांची तर उपाध्यक्षपदाकरीता समुद्रपुर येथील चंद्रमणी जवादे यांची निवड करण्यात आली. याशिवाय इतर पदाधिकाऱ्यांची सुध्दा निवड करण्यात आली आहे.

या सभेचे अध्यक्ष शिक्षकेत्तर महामंडळाच्या महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष अनिल माने हे होते तर, पुण्याचे शिवाजी खांडेकर, ठाण्याचे विनोद गोरे, साताऱ्याचे इमरान मुल्ला हे प्रमुख अतिथी होते. निवडणुक निर्णय अधिकारी म्हणुन सतीश बिडवाईक (हिंगणघाट) यांनी काम पाहिले तर, राम जोशी (वर्धा) हे सहाय्यक निवडणुक अधिकारी होते. निवडणुकीत महिला उपाध्यक्ष पदावर प्रतीबाला दुबे (पुलगाव), कोषाध्यक्ष पदी प्रदिप मिर्झापुरे (देवळी), कार्यवाह पदी विजय शेंडे (वर्धा), सहकार्यवाह पदी दिपक चौधरी (हिंगणघाट), जिल्हा संघटकपदी संदिप हिरुटकर (आष्टी), महिला संघटक पदी मेघना तायडे (वर्धा), प्रसिध्दी प्रमुख म्हणुन संजय पडोळे (आर्वी) यांची तर, दिलीप पवार, नरेश करडे (कारंजा), मानमोडे (समुद्रपुर), प्रदिप गोलाईत (सेलु), गहुकर (समुद्रपुर) यांची कार्यकारणी सदस्य पदावर निवड करण्यात आली आहे.

## वाहतूक पोलिसांची हेल्मेट जनजागृती रॅली



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा, दि. ०६

महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन (रेझिंग डे) सप्ताहाचे औचित्य साधून पोलीस विभागातर्फे जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याच उपक्रमाचा एक महत्वाचा भाग म्हणून, रस्ते सुरक्षा आणि दुचाकी चालवताना हेल्मेटच्या वापराचे महत्त्व पटवून देण्यासाठी वाहतूक विभागातर्फे 'हेल्मेट रॅली' काढण्यात आली.

रॅलीचे नेतृत्व आणि मार्गदर्शन पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी केले. रॅलीमध्ये पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती, यामध्ये सदाशिव वाघमारे, अपर पोलीस अधीक्षक, पुंडलीक भटकर, पोलीस उपअधीक्षक (गृह), विलास पाटील, पोलीस निरीक्षक, वाहतूक शाखा, शेख मजीद शेख बशीर, राखीव पोलीस निरीक्षक आशिष चिलांगे, सहायक पोलीस निरीक्षक, सायबर सेल पोलिस उपनिरीक्षक अमोल लगड राखीव पोलीस उप निरीक्षक गजानन खंडारे यासोबतच वाहतूक शाखा, पोलीस मुख्यालय आणि सायबर सेलचे पोलीस अंमलदार दुचाकींसह आणि हेल्मेटसह या रॅलीत सहभागी झाले होते. जनजागृतीचा संदेश रॅलीदरम्यान पोलीस विभागातर्फे नागरिकांना 'सुरक्षित प्रवासासाठी हेल्मेट अनिवार्य' असल्याचा संदेश देण्यात आला. दुचाकी अपघात होणाऱ्या जीवितहानीचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि वाहतूक नियमांचे शिस्तबद्ध पालन करण्यासाठी वर्धा पोलिसांनी जनतेला आवाहन केले आहे.

## निर्यातदार उद्योगांसाठी निर्यात संमेलन आज

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा, दि. ६

जिल्ह्यातील निर्यात वाढविण्याच्या दृष्टीने ७ जानेवारी रोजी जिल्ह्यातील निर्यातदार उद्योगासाठी जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांच्या अध्यक्षतेखाली एक दिवसीय संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या या निर्यात संमेलनात उद्योजक व निर्यातदार यांनी सहभागी होऊन संमेलनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

विकास भवन येथे सकाळी ९.३० वाजता आयोजित निर्यात संमेलनामध्ये गुंतवणूक, निर्यातवृध्दी, उद्योग सुलभीकरण, एक जिल्हा एक उत्पादन इत्यादी विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले असून यशस्वी उद्योजक, अधिकारी व अनुभवी प्रवक्त्यांचे मार्गदर्शन मिळणार आहे, असे जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापकांनी कळविले आहे.

### शिरपूर शिवारात मारहाणीत एक जण जखमी

**वर्धा, :** आर्वी तालुक्यातील शिरपूर शिवारात शेतातील पिकात बैल चारल्याचा आरोप करत मारहाण करण्यात आली, ही घटना १ जानेवारी रोजी घडली, याप्रकरणी आर्वी पोलिसांनी तक्रारीवरुन गुन्हा दाखल केला, शिरपूर येथील पुरवेश ठाकरे शेतात गेला असता सदाशिव डांगे यांच्यासोबत बोलत होता, दरम्यान, रामेश्वर दुर्गे याने शेतात बैल सोडल्याचे म्हणत पुरवेश ठाकरे यास मारहाण केली. आर्वी पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## स्त्री सक्षम झाली तर राष्ट्र सक्षम होईल - डॉ. देशमुख

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा, दि. ०६

महिला शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन असून स्त्री सक्षम झाली तरच राष्ट्र सक्षम होईल, असे प्रतिपादन ग्रामगीताचार्य डॉ. राजश्री देशमुख यांनी केले. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त ओबीसी जनजागृती संघटनच्या वतीने आयोजित महिला मुक्ती दिन कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सभागृहात आयोजित कार्यक्रमात नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष रोहिणी पाटील उपाध्यक्ष, सत्यशोधक



समाज, जिल्हा वर्धा यांनी अध्यक्षीय भाषणात सावित्रीबाई फुले यांनी प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षणाचा दीप प्रज्वलित करून महिलांना आत्मसन्मानाचा मार्ग दाखवला. आजच्या काळात महिलांनी शिक्षणासोबत सामाजिक भान ठेवून संघटितपणे कार्य करणे आवश्यक आहे. महिलांचा सहभाग वाढल्याशिवाय खरे सामाजिक परिवर्तन शक्य नाही असे सांगितले. प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. शितल भोयर यांनी सावित्रीबाई फुले यांचे कार्य प्रेरणादायी असल्याचे सांगत महिलांनी शिक्षण, स्वयंरोजगार आणि सामाजिक चळवळींमध्ये पुढाकार घेतांना आपला सांस्कृतिक वारसा पण जतन केला पाहिजे, असे आवाहन केले. तर मनिषा अभ्युदय मेघे यांनी बहुजन समाजात पूर्वी महिलांना सन्मानाचे स्थान होते नंतरच्या काळात त्याचे स्वरुप बदलत गेले असे सांगताना महिला सक्षमीकरणासाठी अशा कार्यक्रमांची नितांत गरज असल्याचे सांगितले. फरजाना इजाज कुरेशी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी दिनदर्शिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमास महिला भगिनींसह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, नागरिक व संघटनेचे सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. अर्चना पेठे यांनी केले, प्रास्ताविक कोमल वाटाणे यांनी तर प्रज्ञा चौधरी यांनी आभार मानले.

## सेलू नागपूर महामार्गावर अपघात

### जंगलापुर नजिक चारचाकी वाहनाची ट्रॅक्टरला धडक ,एक ठार, एक जखमी



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

सेलू , दि. ०६

सेलू नागपूर महामार्गावर जंगलापुर पाटीजवळ नागपूरकडे जाणाऱ्या कारने समोरील ऊसाचे ट्रॅक्टरला मागाहून धडक दिल्याने झालेल्या अपघातात एक जण जागीच ठार झाला तर एक गंभीर जखमी झाल्याची घटना सोमवारी दुपारी ४.३० वाजताचे सुमारास घडली. प्रशांत सायंकार वय (४५) रा बोरगाव (मेघे) असे मृत व्यक्तीचे नाव आहे तर ऋषिकेश ढोढरे वय(४०)जामणी असे जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव आहे

प्रशांत सायंकार व ऋषिकेश ढोढरे हे आपल्या चारचाकी वाहन क्रमांक एम एच ३३व्ही १४१९ ने नागपूर कडे जात असताना जंगलापूर पाटी जवळ समोरील ऊस घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टरला मागाहुन धडक दिली ही धडक एवढी जोरदार होती की यात कारचे समोरील भागाचे मोठे नुकसान झाले आहे. या अपघातात प्रशांत सायंकार वय ४५ यांचा जागीच मृत्यू झाला तर दुसरा ऋषीकेश ढोढरे हे गंभीर जखमी झाले घटनेची माहिती मिळताच रुग्णमित्र प्रज्वल लटारे यांनी घटनास्थळी धाव घेत आपल्या रुग्णवाहिकेने जखमीला उपचारासाठी तातडीने रुग्णालयात दाखल केले पोलीसांनी घटनास्थळी भेट देऊन घटनेचा पंचनामा केला असून पुढील तपास सुरु आहे.

## हिंदी विद्यापीठात सावित्रीबाईंना अभिवादन



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा, ०६

क्रांतिकारी सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा यांनी सावित्रीबाई फुले महिला वसतिगृहात सावित्रीबाई फुले यांच्या मुर्तीला माल्यार्पण व पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले. वसतिगृह परिसरात शनिवार, ०३ जानेवारी रोजी आयोजित कार्यक्रमात सावित्रीबाई फुले यांच्या मुर्तीला प्राध्यापक, अधिकारी तसेच विद्यार्थिनींनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी कुलसचिव कादर नवाज खान, कुलानुशासक डॉ. राकेश मिश्रा, मुख्य वसतिगृह अधीक्षक डॉ. जयंत उपाध्याय, वसतिगृह अधीक्षक डॉ. मीरा निचळे, डॉ. गौरी शर्मा, डॉ. संदीप सपकाळे, डॉ. रणंजय कुमार सिंह, डॉ. प्रमोद जोशी, डॉ. हेमचंद्र ससाने, डॉ. सूर्यप्रकाश पांडेय, बी. एस. मिरगे आदींसह सावित्रीबाई फुले महिला वसतिगृह व लक्ष्मीबाई केळकर महिला वसतिगृहाच्या विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वसतिगृह कर्मचारी सुप्रिया उरकुडे, दुर्गा ताजणे, सीमा खडसे, रंजना सुके, निलिमा कठाणे आदींनी सहकार्य केले.

